# ‘‘वर्षभर हिरव्या चाऱ्यासाठी मुरघास ठरतो उपयुक्त’’



नित्यनियमानुसार देवाचे दर्शन आटोपून गणपत संपतची वाट पाहात पारावर बसला होता, संपतनेही देवदर्शन आटोपून गणपतजवळ बैठक मारली.

‘‘कारे गंपा, आज तुझ्या डोक्यात काहीतरी विचार सुरू आहे. काही वेगळं नियोजन वगैरे आहे की काय सांग मला.’’

त्यावर गणपत हसून बोलला, ‘‘कसलं काय नियोजन संपा! आपण खूप नियोजन करतो परंतु होतं का त्यानुसार? आता हेच बघ, यावर्षी दुधाचा व्यवसाय वाढवला. दीडशे- दोनशे लिटर दूध जायला लागलं होतं. मुलगाही या व्यवसायाकडे चांगला लक्ष देत होता. तसं मध्येमध्ये नोकरीचं फार फॅड होतं त्याच्या डोक्यात. पण मुक्त गोठा, दुधाचे मशिन यामुळे दूध धंद्यातील मेहनतीचं काम कमी झालं तसंच बऱ्यापैकी पैसाही मिळायला लागला. मुलगाच बघत होता सर्व दूध व्यवसायाचं. पण करोनाने दूध धंद्याचे फार कंबरडे मोडले बघ. तीस- बत्तीस रुपये दुधाचा भाव पार निम्म्यावर म्हणजे १७-२० रुपये लिटरवर आणून ठेवलाय. फारच गणित बिघडलं बघ. म्हणतात ना ‘दुष्काळात तेरावा महिना’, त्याप्रमाणे. आता हिरवा चाराही नेमकाच संपला. आता मका- कडवळ सुरू व्हायला अजून दोन महिने वेळ आहे. तोपर्यंत काय चारा खाऊ घालावा हेच कळेना! ऊस आहे परंतु ऊसामुळे गायींचे कॅल्शियम कमी होते, असे डॉक्टरांनी सांगितले होते. म्हणून काळजीत होतो. एवढ्या गायींना आता हिरवा चारा कोठून उपलब्ध करू? खरं तर हा प्रश्न अनेक शेतकऱ्यांना भेडसावत असतो. ऐन पावसाळा सुरू झाल्यानंतर दोन- तीन महिने हिरव्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण होतो.’’

संपत यावर हसून म्हणाला, ‘‘हे बघ गंपा, तूही म्हणजे फारच अवघड बाब आहे बघ. तू म्हणतो मी दुधाचा धंदा वाढवला, कष्ट कमी करण्यासाठी मुक्त गोठा केला तसेच मिल्किंग मशिनही घेतले पण चाऱ्याचे नियोजन काय केले? तुझ्याकडे मका, कडवळ, घास, गिन्नी गवत ही चारा पिके असतात हे मला माहीत आहे. परंतु कोणत्याही चारा पिकाचे उत्पादन हे हवामानावर अवलंबून असते. जास्त थंडी, ऊन, पाऊस झाला की चारा उत्पादनावर परिणाम होतो. मग अशा वेळी अडचणी येतात. आणखी एक, तू म्हणाला की दुग्ध व्यवसायातील कष्ट कमी करण्यासाठी तुझ्या मुलाने सर्व नवनवीन तंत्रज्ञान वापरले मग त्याने चारा व्यवस्थापन करण्यासाठी तसेच शारीरिक कष्ट कमी करण्यासाठी मुरघासाचे तंत्रज्ञान का वापरले नाही याचे मला नवल वाटते.’’

गणपत सर्व बाबी ऐकून मान डोलावत होता. परंतु मुरघास म्हटल्यानंतर त्याचे डोळे चमकले. ''अरं संपा, माझ्याकडे लसूणघास आहे तसेच इतर चारा पिके आहेत. परंतु हा मुरघास कसा पेरायचा आणि कधी येतो, किती दिवस शेतात राहातो, किती कापण्या होतात याबद्दल मला काहीच माहीत नाही.''

यावर मात्र संपत मोठ्याने हसून म्हणाला, ''गंपा, म्हणून तुला म्हणत असतो की वाचन करत जा. शेतीविषयक काही कार्यक्रमांना हजर राहात जा. तू शेतात ढोरमेहनत खूप करतो परंतु माहिती घेण्याच्या बाबतीत सतत मागेच! अरे गंपा, मुरघास म्हणजे घासाचा प्रकार नाही. वर्षभर गायींना हिरवा चारा अत्यंत उत्कृष्ट प्रकारे उपलब्ध करून देण्यासाठी आपल्या शेतातील विविध चाऱ्यांपासून तयार केलेला वेगळ्या प्रकारच्या चाऱ्याला मुरघास म्हणतात. हे बघ, आपण वर्षभर लोणचे खातो. वर्षभर कैरी मिळत नाही. म्हणून आपण कैरीच्या काळात त्यांचे लोणचे तयार करतो आणि वर्षभर खातो. अशाच प्रकारे ज्यावेळी आपल्या शेतामध्ये हिरवा चारा मुबलक असतो अशा वेळी हा हिरवा चारा एका विशिष्ट प्रकारे साठवून ठेवणे यालाच मुरघास म्हणतात. मग हा मुरघास आपणास जेव्हा पाहिजे तेव्हा आपण गरजेनुसार वर्षभर वापरू शकतो.''

यावर गणपतचे समाधान झाले नाही, तो म्हणाला, ''अरं संपा, मला समजेल अशा साध्या- सोप्या भाषेत सांग ना!''

यावर हसत संपत म्हणाला, ''हे बघ गंपा, एक तर आपण कोणताही व्यवसाय सुरू करताना किंवा चालविताना त्याचा कच्चा माल उपलब्ध आहे की नाही यावर लक्ष देतो. वर्षभर कच्चा माल मिळत असेल तरच तो व्यवसाय सुरू राहतो. तसाच विचार आपण दुग्ध व्यवसायामध्येही केला पाहिजे. गायीला वर्षभर हिरवा चारा योग्य प्रमाणात आणि चांगल्या प्रतीचा उपलब्ध करून देणे हे यशस्वी दूध उत्पादकाचं लक्षण आहे. म्हणून हिरवा चारा ज्यावेळी मुबलक असतो त्यावेळी तो साठवून ठेवून वर्षभर त्याचा वापर करता येतो. यासाठी मुरघास तंत्रज्ञानाचा वापर करता येईल. हिरव्या चाऱ्याची बारीक कुट्टी करून ही कुट्टी हवाबंद करून ठेवली जाते. यासाठी खड्डा पद्धती, रँप पद्धती, तसेच बॅग पद्धतीचा वापर केला जातो. आता तर मुरघास बनविण्यासाठी बॅगिंग पद्धतीचा वापर सुरू झाला आहे. मुरघास तयार करताना हिरव्या चाऱ्याच्या कुट्टीचा थर दिला जातो. त्यावर थोडेसे मीठ टाकले जाते. अशा प्रकारे थरावर थर दिले जातात. चाऱ्याची कुट्टी भरताना ती जास्तीत जास्त दाबली जाते, ती यासाठी की त्यामध्ये ऑक्सिजनचे (हवा) प्रमाण कमी करणे महत्त्वाचे आहे, कारण मुरघास बनविण्यासाठी कार्बन डायऑक्साईडची गरज असते. जे जिवाणू हिरवा चारा आंबवून मुरघास बनवितात त्यांचे कार्य ऑक्सिजनविरहीत वातावरणात होत असते. हवेचे प्रमाण कुट्टीमध्ये राहिले तर ती कुट्टी खराब होते. म्हणून चाऱ्याची कुट्टी चांगली दाबावी लागते. मुरघास बनविताना मिठाचा वापर एक टन चाऱ्यासाठी २ ते ३ किलो या प्रमाणात करावा. यामुळे मुरघासाला बुरशी लागत नाही तसेच मुरघास चांगला होऊन टिकण्याचे प्रमाण वाढते. मुरघास बनविण्यासाठी आज सायलेज बॅगचा मोठ्या प्रमाणात वापर करतात. अर्थात यासाठी मजुरांची मोठ्या प्रमाणात गरज असते. यावर उपाय म्हणून बॅगिंग पद्धतीने मुरघास बनविण्याचे तंत्रज्ञान उपलब्ध झालेले आहे. याचा वापर करून मजुरांचा प्रश्न कमी करता येतो. तसेच मुरघासाची प्रतही चांगली मिळते.''

संपत बोलतच राहिला आणि गणपत मान डोलावतच राहिला.

''मला एक संपा, मुरघासाची बॅग भरल्यानंतर किती दिवसांनी मुरघास खायला तयार होतो? एका बॅगेत किती किलो मुरघास भरता येतो? एका गायीला किती मुरघास खाऊ घालायचा? मुरघास किती टिकतो?''

खरं तर या प्रश्नांतून गणपतचे मन मुरघासाबद्दल चाळवले होते. हे बघून संपत म्हणाला, ''अरं थांब गंपा, किती प्रश्न विचारशील? थोडं दमानं घे की! हे बघ, ज्यावेळी आपण मुरघासाची बॅग भरून ती पूर्ण हवाबंद करतो त्यानंतर ४० ते ४५ दिवसांत मुरखास खाण्यास तयार होतो. मुरघासाची बॅग उघडल्यानंतर दररोज मुरघास काढावा लागतो. कारण हवा गेल्याने मुरघास खराब होऊ शकतो. त्यामुळे दररोज कमीत

कमी ४-५ इंचाचा थर काढावाच लागतो. एका बॅगमध्ये सर्वसाधारणपणे ८०० ते १००० किलो चारा बसतो. एका गायीला सर्वसाधारणपणे इतर चाऱ्याच्या उपलब्धतेचा विचार केला तर १० ते २० किलो मुरघास घाऊ घालता येतो. मुरघास बनविल्यानंतर सर्वसाधारणपणे एका वर्षापर्यंत मुरघासाची प्रत चांगली राहाते. अर्थात थोडे जास्त दिवस ठेवले तरीही मुरघास टिकतो. त्यामुळे जास्त विचार करायची गरज नाही.''

संपतला मध्येच थांबून गणपत म्हणाला, ''कारे संपा, माझ्याकडे हिरवा चारा भरपूर असताना तो तसाच खाऊ घालावा की त्याचा मुरघास बनवावा? म्हणजे माझ्या काय डोक्यात आहे- मुलगा म्हणतो दररोज जा शेतात, काढा चारा आणि कुट्टी करून खाऊ घाला यात फार वेळ जातो. मग सगळ्या चाऱ्याचा मुरघास बनवावा की काय? याचा मनात गोंधळ सुरू आहे.''

यावर हसत संपत म्हणाला, ''हे बघ गंपा, आपल्या शेतात विविध चारापिके असतात. लसूणघास, कडवळ, मका, गिन्नी गवत किंवा इतर चारा पिके. यापैकी फक्त मका पिकाचाच मुरघास बनवावा. कारण या पिकाचा मुरघास सर्वात चांगला होतो. गिन्नी गवत किंवा इतर चारा दररोज काढून त्याची कुट्टी करून ताजा वापरावा. म्हणजे लसूणघास, गिन्नी गवत, कडवळ किंवा इतर चारा कुट्टी करावी. त्यामध्ये गहू, सोयाबीन, हरभरा, तूर यासारख्या पिकांचा भुस्सा मिसळावा. या चाऱ्याचे प्रमाण उपलब्धतेनुसार ५० ते ६० टक्के ठेवावे. बाकीचा चारा म्हणून मुरघासाचा वापर करावा. जर शेतात काहीच हिरवा चारा नसेल तर मुरघास तसेच वाळलेला भुस्सा यांचा वापर करूनही आपण जनावरांच्या आहाराचे नियोजन करू शकतो. अर्थात लसूणघास त्यांच्या आहारात असावा किंवा प्रथिनांच्या वापरासाठी पेंडीचे प्रमाण जास्त द्यावे.''

संपतच्या या सर्व बारीकसारीक माहितीमुळे गणपतच्या मनातील सर्व शंका दूर झाल्या होत्या. ''अरे संपा, तू माझ्या डोक्यावरचे फार मोठे ओझे कमी केले. यावर्षी माझ्याकडे तीन एकर मका दाण्यासाठी लावला होता आता त्याचा सर्व मुरघास बनवतो. यामुळे वर्षभर गरजेइतका पुरेसा चारा मिळेल आणि दररोज चारा काढायचा त्रासही कमी होईल. त्यामुळे मुलगाही दूध व्यवसायाला वैतागणार नाही आणि या व्यवसायामध्ये चांगला रस घेईल. चल मित्रा स्पेशल चहा पाजतो, मग जाऊ आपआपल्या कामाला...''

**(सौजन्य : 'पूर्वा कृषिदूत' परिवार)**

---

## लेखकांना आवाहन...

**'पूर्वा कृषिदूत'** परिवाराशी आपण गेली काही वर्षे लेखक या नात्याने निगडित आहात, याचा मन:पूर्वक आनंद वाटतो. (सध्या आपण प्रस्तुत मासिक डिजिटल स्वरुपात प्रकाशित करीत आहोत. ही बहुरंगी ऑनलाईन आवृत्ती आपणास कशी वाटते, ते जरुर कळवा.)

आपल्या लेखासोबत आपला सविस्तर पत्ता मोबाईल नंबरसह नमूद करावा ही विनंती. तसेच आपला पासपोर्ट आकाराचा फोटोही जरुर पाठवावा. आपले लेखन सहकार्य असेच लाभत राहील याची खात्री आहेच; आपल्या नवीन उपक्रमांना तसेच व्यक्तिगत, व्यावसायिक संकल्पांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

-: आमचा पत्ता :-

पूर्वा कृषिदूत, एम-११३, एम.आय.डी.सी., अंबड, नाशिक- ४२२०१० (महाराष्ट्र).

email:poorvakrushidoot@gmail.com

**- संपादक, 'पूर्वा कृषिदूत'**